# ठाण्यातील क्लस्टर उद्घाटनाचे फडणवीसांना निमंत्रणच नाही

## क्लस्टरच्या लगीनघाईवरून शिवसेना विरुद्ध भाजप सामना

■ ठाणे

ठाण्यातील महत्वपूर्ण क्लस्टर प्रकल्पाला तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली होती. त्याबद्दल शिवसेनेच्या नेत्यांनी देवेंद्र फडणवीसांच्या आभाराचे बॅनर लावून समाजमाध्यमांवर पोस्ट टाकल्या. मात्र, आता क्लस्टर प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमाचेच फडणवीसांना निमंत्रण देण्यास शिवसेना विसरली, असा आरोप भाजपाचे आमदार व ठाणे शहराध्यक्ष निरंजन डावखरे यांनी केला आहे.तसेच,आवश्यक मंजुरी मिळाली नसतानाही क्लस्टर उद्घाटनाची लगीनघाई का, असा सवाल डावखरे यांनी केल्याने क्लस्टरवरून शिवसेना विरुद्ध भाजप सामना रंगणार आहे.

ठाणे शहर अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर आ.डावखरे यांनी प्रथमच पत्रकारांशी संवाद साधला. क्लस्टरच्या मंजुरीवेळी शिवसेनेने देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचे ठिकठिकाणी पोस्टर्स लावले होते. तसेच विद्यमान नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेत १८ सप्टेंबर २०१९ रोजी पत्राकार परिषद घेतली होती. त्यावेळी देवेंद्र फडणवीसांचे आभार मानणाऱ्या शिवसेना नेत्यांना आता क्लस्टर प्रकल्पाच्या उद्घाटनाचे निमंत्रण देण्यास विसर पडला.या प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी देवेंद्र फडणवीस यांना बोलाविले पाहिजे. शिवसेनेला श्रेय घ्यायचे, तर त्यांनी घ्यावे.

ठाणे महापालिकेच्या वेबसाईटवर क्लस्टरबाबत कुठलीही माहिती नाही. क्लस्टर प्रकल्पाच्या यूआरपीला (अर्बन रिन्यूअल प्लॅन) मंजुरी मिळालेली नसून, अद्यापी आयओडी (इंटिमेशन ऑफ डिसॲप्रूव्हल) देण्यात आलेली नाही. त्यामुळे ई-भूमिपूजन करण्यासाठी लगीनघाई का केली जात आहे. त्याचबरोबर गावठाणे व कोळीवाडे वगळण्याबाबत पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबरोबर चर्चा करुन भूमिका जाहीर करावी. असे आव्हान डावखरे यांनी शिवसेनेला दिले आहे. ठाण्यातील क्लस्टरचे देवेंद्र फडणवीस हे भाग्यविधाते असतानाही क्लस्टरचे श्रेय घेण्याचा शिवसेनेचा प्रयत्न आहे. असा टोला आमदार संजय केळकर यांनी मारला. यासंदर्भात, पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी क्लस्टरची अमलबजावणी पूर्णत: नियमानुसार, सर्व प्रकारच्या परवानग्या घेऊनच केली जाणार असून विरोधकांनी याबाबत कुठलेही राजकारण करू नये.असा प्रतिटोला लगावला आहे.

# लोकशाही मार्गाने आपले प्रश्न मांडा, कायदा - सुव्यवस्था राखा, अन्यथा कारवाई

## उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी

## सानेगाव जेट्टीच्या अवजड वाहतुकी विरोधात वावे ग्रामस्थ आक्रमक

महेंद्र मोरे

■ रोहा

पोलीस प्रशासन हे कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सदैव तत्पर असते. आपल्या भागातील जेट्टी मुळे आपणांस कोणत्याही प्रकारचा त्रास होत असलेल तर यासंबंधित निगडीत असलेल्या सर्व कार्यालयांचे मध्ये आपण तक्रारी कराव्यात. लोकशाही पद्धतीने प्रत्येकाला आपल्या समस्या मांडण्याचा अधिकार आहे आपणही त्याचा वापर करावा. असे होत असताना एखाद्या उद्योगामुळे अथवा त्याच्या मालाच्या होत असणाऱ्या वाहतुकीमुळे जर आपणांस शारिरीक व मानसिक त्रास होत असेल तर पोलीस खाते व अन्य खात्यांचे कडे तक्रारी करा. रात्री अपरात्री रस्ता अडवून गाड्या रोखून कायदा हाता घेण्याचा प्रयत्न करु नका.अन्यथा यापुढे जर असे कृत्य घडले तर कोणाची गैर केली जाणार नाही. याबरोबरच वाहतूक ठेकेदार व सानेगाव जेट्टी प्रशासन यांनीही नियमबाह्य वाहतूक करु नये अन्यथा कोणाचीही गय न करता कारवाईचा बडगा दाखविला जाईल. अशी



समज वजा तंबी रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांनी रोहा पोलीस स्थानकात वावे ग्रामस्थ, वाहतूक ठेकेदार, जेट्टीचे अधिकारी यांच्या घेतलेल्या बैठकीत दिली. मंगळवारी रात्रौ सानेगाव जेट्टी मधून सुरु झालेल्या गंधकाच्या वाहतूकीला वावे ग्रामस्थांनी विरोध करत वाहतूक करणाऱ्या गाड्या अडविल्या होत्या. यामुळे वाहतूक ठेकेदार व ग्रामस्थ यांच्यामध्ये आपापसात तक्रारींचे वातावरण होते. याची दखल घेत उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेत चर्चेने सर्व तक्रारींचे निराकरण करत आवश्यक त्या सुचना दिल्या.यावेळी पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, सहाय्यक पोलीस निरिक्षक सुभाष जाधव, यांचेसह वावे ग्रामस्थ व वाहतूक ठेकेदार उपस्थित होते.

रोहा तालुक्यातील सानेगाव इंडो एनर्जी जेट्टी ही आजपर्यंत कोळश्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रदुषणामुळे गाजत होती. आता यामध्ये जेट्टीमध्ये पिवळे गंधक (फॉस्फरस) याची वाहतूक होण्यास सुरुवात झाली आहे. आधीच कोळश्याच्या वाहतूक व साठ्याने त्रस्त असलेले स्थानिक नागरिकांना गंधकाच्या दुर्गंधी व शारीरिक हानिला सामोरे जावे लागते. आठवडाभरापुर्वी हा गंधक जेट्टी मधून बाहेर आला तेव्हा त्यास ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला होता. याची दखल घेत रोहा पोलिसांनी सर्व परिस्थितीची स्वत: पाहणी करत माहिती घेतली होती.यासोबतच नियमबाह्य वाहतूक करणाऱ्या वाहतुक ठेकेदारांचे वर कारवाई केली होती. त्यामुळे गंधक वाहतूक हि बंद झाली होती. मात्र मंगळवारी पुन्हा गंधक वाहतूक सुरु झाल्यामुळे वावे ग्रामस्थांनी याला विरोध करत वाहतूक रोखली. यामुळे ग्रामस्थ व वाहतूक ठेकेदारांच्या आक्रमक भूमिकेमुळे वातावरण काहिसे गरम झाले होते. याची दखल घेत तातडीने रोहा पोलीस घटनास्थळी दाखल होत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. त्यानंतर बुधवारी सर्व संबधितांची बैठक रोहा उपविभागीय अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी यांनी घेत कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने सगळ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत आवश्यक सुचना दिल्या.

**INDSOYA LIMITED**
CIN: L67120MH1980PLC023332
Regd. Office: 1111-A Raheja Chambers, 213, Nariman Point, Mumbai – 400021
Email: info@indsoya.com
Website: www.indsoya.com
contact No: (022) 22852796-97-99
NOTICE
Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 (1) (a) of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that the meeting of the Board of Directors of the Company will be held on Friday, 14th day of February, 2020, *interalia*, to consider and approve un-audited financial results of the Company for quarter ended on 30th December, 2019 and any other matter permitted by the Chair. For further details please refer the weblink – www.indsoya.com and website of BSE Limited www.bseindia.com
For INDSOYA LIMITED
SD/-
Shivkumar Vaishy
Company Secretary
A45528
Place: Mumbai
Date:04.02.2020

**एलोरा ट्रेडिंग कंपनी लि.**
CIN: L70100MH1982PLC296275
**नोंद. कार्यालय:** १, तळ मजला, प्लॉट क्र. ३७/३९, राजयोग इमारत, १ ली कार्पेंटर स्ट्रीट, सी पी टँक, गिरगाव, मुंबई - ४००००४.
**ईमेल पत्ता:** aloratradingcompany@gmail.com
**वेबसाईट:** www.aloratradingltd.com
**दूरध्वनी क्र.:** +९१ ८५९०३०६०७०
**सूचना**
**दि. ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष**, इतर बाबींसोबतच, आणि इतर कोणतेही प्रकरण अध्यक्षांच्या परवानगीने विचारात घेण्याकरिता, मंजूर करण्याकरिता आणि नोंदपटावर घेण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक **मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी** त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात घेण्यात येणार आहे.
सदर सूचना कंपनीचे भाग सूचीबद्ध असलेल्या बीएसई वेबसाईट www.bseindia.com वर आणि कंपनीच्या वेबसाईट www.aloratradingltd.com वर उपलब्ध असेल.
**एलोरा ट्रेडींग कंपनी लिमिटेड** करिता
**सही/-**
**दिनांक: ०४.०२.२०२०** **सुरेश नासकर**
**ठिकाण: मुंबई** **व्यवस्थापकीय संचालक**

# मुंबईतील कचऱ्याची विल्हेवाट नव्या तंत्रज्ञानाने

- ■ 'प्लाझ्मा' या आधुनिक पद्धतीचा वापर
- ■ शहर, उपनगरांत यंत्रणा बसवणार
- ■ दररोज चार मेट्रिक टनावर प्रक्रिया



मुंबई

मुंबईतील कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस जटील होत चालल्याने महापालिकेने घरातील ओल्या आणि सॅनिटरी नॅपकीनसारख्या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी 'प्लाझ्मा' हे नवीन तंत्रज्ञान आणण्याचे ठरवले आहे. यामध्ये अत्याधुनिक पद्धतीने कचरा वर्गीकरण आणि विघटन प्रक्रिया वेगाने होणार आहे. मुंबई शहर आणि पूर्व-पश्चिम उपनगरांमध्ये ही यंत्रणा उभारली जाणार असून दररोज चार मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे.

मुंबईत सध्या दररोज सुमारे ६८०० मेट्रिक टन इतका कचरा निर्माण होत आहे. यामध्ये सुमारे ५००० मेट्रिक टन कचऱ्यावर कांजुरमार्ग येथे बायोरिॲक्टर या शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया करण्यात येते. देवनार डम्पिंग ग्राऊंडमध्ये सुमारे १८०० मेट्रिक टन कचऱ्याची पारंपरिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येते. प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट पुनर्प्रक्रियेतून लावण्यात येते. असे असले तरी काही प्रमाणात ओला आणि सुका कचरा एकत्रच जमा होतो. यामध्ये जमा होणाऱ्या ओल्या आणि सॅनिटरी पॅडसारख्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी हे नवे तंत्रज्ञान वापरले जाणार आहे.

'प्लाझ्मा' तंत्रज्ञानाने कचरा विल्हेवाटीसाठी मे. हिंदुस्थान इंजिनीअरिंग कॉर्पोरेशनला कंत्राट देण्यात येणार आहे. या कामासाठी ६ कोटी ८६ लाख ९0 हजार रुपये खर्च केला जाणार आहे. यामध्ये कंत्राटदाराला शहर आणि दोन्ही उपनगरांत प्रत्येकी एक 'प्लाझ्मा' यंत्रणा उभारून काम करावे लागेल. या कामाचा कालावधी एक वर्षाचा असेल. याबाबतचा प्रस्ताव आगामी स्थायी समितीत मंजुरीसाठी मांडण्यात येणार आहे.

### कशी लावणार विल्हेवाट?

- ■ सॅनिटरी पॅडसारखा कचरा उघड्यावर जाळता येत नसल्याने प्लाझ्मा तंत्रज्ञानात विशेष व्यवस्था.
- ■ बंदिस्त व्यवस्थेत कचऱ्यावर 'मॉक्युलर सेपरेशन', लिक्विड, गॅस रूपांतराचे काम करणार.
- ■ यामध्ये चुंबकीय पद्धतीच्या उच्च दाबाने कचऱ्याची विल्हेवाट बंदिस्त स्वरूपात केल्यामुळे प्रदूषणाचा धोकाही टळणार.

## रुळावर पडलेल्या प्रवाशाचे प्राण वाचवले

मुंबई

रुळांवर बेशुद्धावस्थेत पडलेल्या तरुणाला पोलिसांनी खांद्यावर घेऊन वेळीच रुग्णवाहिकेजवळ पोहोचवल्याने तरुणाचे प्राण वाचले. शनिवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास गस्त घालत असताना दादर प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वरील रुळांवर एक तरुण जखमी अवस्थेत पडल्याचे पोलिसांना दिसले. यावेळी कर्तव्यावर असलेल्या हवालदार भडाळे व सावंत यांनी या तरुणाला खांद्यावरून प्लॅटफॉर्म क्रमांक ६ बाहेरील रुग्णवाहिकेमध्ये पोहोचवले.

# महापारेषणच्या नालासोपारा उपकेंद्रात शुक्रवारपर्यंत रोहित्र कार्यान्वित होणार

## महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे युध्दपातळीवर काम

■ मुंबई

महापारेषणच्या २२० के. व्ही. नालासोपारा उपकेंद्रात दि. ३ फेब्रुवारी रोजी पहाटे २ वाजून २० मिनिटांनी १०० एमव्हीएचे रोहित्र निकामी झाल्यामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. दरम्यान, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने रोहित्र बदलण्याचे काम हाती घेतले आहे. येत्या तीन दिवसात (दि. ७) शुक्रवारपर्यंत रोहित्र कार्यान्वित होईल, अशी माहिती महापारेषणने प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे. महावितरणच्या २२ के. व्ही. फिडर क्रमांक १७मध्ये हा बिघाड झाला होता. शॉर्टसर्किट करंट हा कार्यक्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात १०० एमव्हीए ट्रान्सफॉर्मरवरून प्रवाही झाला. त्यामुळे मोठा बिघाड होऊन ग्राहकांना खंडित वीजपुरवठ्याचा मनस्ताप सहन करावा लागला. महावितरणच्या प्रणालीमध्ये २२ के. व्ही. वाहिनीवर असे प्रकार वारंवार होऊलागले आहेत. यापूर्वी २२० के. व्ही. नालासोपारा येथील उपकेंद्रात १०० एमव्हीएचे रोहित्र निकामी झाले होते.

दरम्यान, नालासोपारा उपकेंद्रातील वीजपुरवठा शुक्रवारपर्यंत पूर्ववत होईल, अशी माहिती महापारेषणच्या वतीने देण्यात आली आहे.

# लातूर महानगरपालिकेने सहायक अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव करावा

मुंबई

गेल्या तीन ते चार वर्षांमध्ये लातूर जिल्ह्यात आलेली दुष्काळी परिस्थिती पाहता लातूर महानगरपालिकेने सहायक अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख यांनी दिल्या.



देशमुख यांनी त्यांच्या दालनात लातूर महानगरपालिकेतील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक घेतली. या बैठकीस लातूर महानगरपालिकेचे महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्यासह नगरविकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

देशमुख यावेळी म्हणाले, गेल्या काही वर्षात लातूर येथे दुष्काळी परिस्थिती असल्याने महानगरपालिकेला करातून रक्कम जमा करणे शक्य झाले नसल्याने विशेष बाब म्हणून या महानगरपालिकेला सहायक अनुदान मिळावे, असा प्रस्ताव तयार करण्यात यावा. तसेच टंचाई काळात मंजूर टँकर भाडे महानगरपालिकेला मदत व पुनर्वसन विभागाकडून मिळावे जेणेकरुन नगरपालिकेने यासाठी खर्च केलेले पैसे त्यांना पुन्हा मिळणे शक्य होईल.

दुष्काळी काळातील टँकर भाडे माफ करणे, शहरातील मुख्य रस्त्यांकरिता निधी मिळणे, लातूर महानगरपालिकेच्या विविध योजनांसाठी देण्यात येणारा निधी,मुलभूत सोयी सुविधा अंतर्गत विशेष निधी मिळणे या सर्व बाबींसाठी लातूर महानगरपालिकेने नगरविकास विभागाशी समन्वय ठेवून याबाबी पूर्ण कराव्या अशा सूचनाही देशमुख यांनी यावेळी केल्या.

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), मुंबई यांचे कार्यालय**
**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ, नायगांव रोड नं. २६, मुंबई-४०० ०३१.

**जाहीर नोटीस**

**दि सह्याद्री सहकारी बँक लि., मुंबई … अर्जदार**
५/७ विजयवाडी, सह्याद्री भुवन,
३ रा माळा, चिरा बाजार, मुंबई ४०० ००२.

**अनुक्रमांक १ ते ३ … जाब देणार**

खालील दर्शविलेल्या विषयासंदर्भात जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला** मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दि. २४.०२.२०२०** रोजी **दुपारी १२.००** वाजता आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | जाब देणार क्र. | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार - मुळीक हरिश्चंद्र जोतीराम | १ | २७.११.१९ | ४२३४/१९ | ३,२४,५०३/- | २४.०२.२० |
| | जामीनदार - मुळीक मोतीराम जोतीराम | २ | | | | |
| | जामीनदार - मुळीक लक्ष्मीबाई मोतीराम | ३ | | | | |
| २ | कर्जदार - लोखंडे संकेत रंगनाथ आणि लोखंडे रंगनाथ बुधाजी | १ | २७.११.१९ | ४२३५/१९ | ५,५२,०१३/- | २४.०२.२० |
| | जामीनदार - सांगले अतुल दत्तात्रय | २ | | | | |
| | जामीनदार - साळुंखे अभिजीत सुरेश | ३ | | | | |
| ३ | कर्जदार - सांगले अतुल दत्तात्रय | १ | २७.११.१९ | ४२३६/१९ | ५,६८,३५०/- | २४.०२.२० |
| | जामीनदार - लोखंडे संकेत रंगनाथ | २ | | | | |
| | जामीनदार - लोखंडे रंगनाथ बुधाजी | ३ | | | | |

ही नोटीस आज **दिनांक ३१.०१.२०२०** रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
शिक्का
**श्री. सुनिल बनसोडे**
उपनिबंधक, सहकारी संस्था
**मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई**

# खेळाडुंच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कुस्ती स्पर्धेचे आयोजन – आमदार दिलीप लांडे

## कुर्ल्यातील अ. भा. मुंबई महापौर चषक कुस्ती स्पर्धेमध्ये सुनील फडतरे ठरला अंतिम विजेता

मुंबई

शिवसेना चांदीवली विधानसभा, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई शहर उपनगर जिल्हा तालीम संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या ३२ व्या अखिल भारतीय मुंबई महापौर चषक कुस्ती स्पर्धेमध्ये खुल्या वर्गातील अंतिम सामन्यात कर्नाटकचा पेहलवान सुनील फडतरे हा विजेता ठरला तर उपविजेताचा चषक दादा शेलार यांनी पटकावला आहे.



शनिवार १ फेब्रुवारी रोजी कै. गंगाधर साटम मैदान (काजूपाडा उद्यान) येथे आयोजित केलेल्या या स्पर्धेचे उदघाटन उपमहापौर ॲड सुहास वाडकर यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या दिवशी मनपा कार्यक्षेत्रातील शाळा व मुंबई जिल्हा मर्यादित शालेय स्तरावरील सर्व वजनी गटाच्या उपांत्य फेरी पर्यंतच्या लढती झाल्या तर दुसऱ्या दिवशी सर्व गटातील अंतिम लढती झाल्या. दरम्यान खुला गटातील लढती अटीतटीच्या झाल्या. यावेळी खुला गटात चालुवर्षातील महान भारत केसरी सिकंदर शेख, कुस्ती दंगल गाजवणारा आदर्श गुंड, भारत लोकरे, सुरज मुल्लाणी, राष्ट्रीय खेळाडू अक्षय मंगवडे, हर्षवर्धन थोरात, लव्हाजी साळूखे, भारत लोकरे, विकास धोत्रे, समाधान पाटील, गुलाब आगरकर यासारखे अनेक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत चमकलेली खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी अंतिम लढती झाल्या यावेळी बक्षीस वितरण परिवहनमंत्री ॲड अनिल परब, ऑलम्पिक विजेता नरसिंह यादव व आमदार दिलीप लांडे यांच्या शुभहस्ते देण्यात आले. या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद या युट्युब चॅनल द्वारे दाखविण्यात आले.

कुस्तीप्रेमींनी कुस्ती पाहण्यासाठी गर्दी केली होती याप्रसंगी आमदार दिलीप लांडे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले कि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त प्रतिवर्षी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात येत असतात. लाल मातीतील या खेळाला महत्व प्राप्त आहे. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात कुस्तीच्या स्पर्धा होतात. यातूनच नवे खेळाडू घडत असतात. अशा खेळाडूंच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कुस्ती सामन्याचे दरवर्षी आयोजन करण्यात येते.

यावेळी नगरसेवक विजयेंद्र शिंदे, माजी नगरसेवक सोमनाथ सांगळे, ईश्वर तायडे, कोमल जामसंडेकर, विधानसभा संघटिका अश्विनी मते, उपविभाग संघटिका ज्योत्स्ना दळवी, मनीषा नलावडे, उपसमन्वयक चंद्रप्रभा मोरे, लता कर्णे, युवती विधानसभा अध्यक्ष प्रिया सूर्यवंशी, शाखाप्रमुख नितीन चव्हाण, अनंत उतेकर, लक्ष्मीकांत गवंडे, बाळकृष्ण गटे, उमाकांत भांगीरे, शैलेश निंबाळकर, नितीन गोखले, बाबू मोरे, पार्वती शिंदे, पार्वती दारकुंडे आणि मुंबई शहर उपनगर जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार विजेते पै. संपतराव साळुंखे, सेक्रेटरी विनायक गाढवे, खजिनदार सतीश कदम आदीसह कुस्तीप्रेमी उपस्थित होते.